महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कार्यकारी संपादक : श्री. विजय यादव | jeevandeepvartanews2020@gmail.com | मुख्य संपादक : श्री. रविंद्र घोडविंदे | Rs.2/-

गुरुवार ❖ १४ नोव्हेंबर २०२४ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १३१ ❖ पाने - ४

RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024



## काँग्रेसच्या दावणीला बांधलेले सरकार उलथवून टाकले

### - कल्याण येथील सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विरोधकांवर हल्लाबोल

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण - महाराष्ट्राला अधोगतीकडे नेणारे विकासविरोधी, शिवसेनाप्रमुखांचे विचार आणि धनुष्यबाण ज्यांनी काँग्रेसच्या दावणीला बांधले, असे महाविकास आघाडीचे सरकार आपण उलथवून टाकले. असे केले नसते तर कल्याण पश्चिमेसह महाराष्ट्रात विकासाची गंगा आज निर्माण झाली नसती, अशी टीका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी येथे महाविकास आघाडीच्या सरकारवर केली.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात औद्योगिक क्षेत्रात देशात महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर फेकला गेला होता. महायुतीचे सरकार राज्यात येताच पुन्हा उद्योग, व्यवसाय, गुंतवणूक, नवउद्यमी, पायाभूत सुविधांमध्ये राज्य प्रथम क्रमांक आणण्यात यशस्वी झाले. राज्यातील आघाडीचे सरकार उलथून टाकले नसते तर आपण आणखी अधोगतीकडे गेलो असतो. त्यामुळे वेळेतच हे सरकार आपण उलथून टाकल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

शिवसेनेची कधीही काँग्रेस होऊ देणार नाही. तसे झाले तर माझे दुकान मी बंद करीन असे शिवसेनाप्रमुख सांगायचे. पण यांनी मुख्यमंत्री पदाचा मोह, स्वार्थासाठी काँग्रेसच्या दावणीला शिवसेना पक्षाला बांधले, अशी टीका त्यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. शिवसेनाप्रमुखांचे विचार समोर ठेऊन जे घडले ते सहन न झाल्याने आपण महाविकास आघाडीचे सरकार उलथून टाकले, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. महायुतीचे कल्याण पश्चिमेतील महायुतीचे उमेदवार विश्वनाथ भोईर, कल्याण ग्रामीणमधील महायुतीचे उमदेवार राजेश मोरे यांच्या दोन स्वतंत्र सभांमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी कल्याणमध्ये यशवंतराव चव्हाण मैदानात, डोंबिवलीत नांदिवली स्वामी समर्थ मठ भागात घेतल्या. कल्याण ग्रामीणमध्ये सामान्यांच्या सुखदुखात सहभागी होणारा, नाती जपणारा, ती घट्ट ठेवणारा राजेश मोरे यांच्यासारखा हाडाचा शिवसैनिक उमेदवार म्हणून दिला आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी कल्याण ग्रामीण मतदारसंघाने खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांना ८६ हजाराचे मताधिक्य मिळून दिले. मताधिक्याची हीच बैठक कायम ठेऊन आपण उमेदवार मोरे यांना आपण साथ द्यायची आहे, असे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. मागच्या वेळेस कल्याण ग्रामीणमध्ये आपण गाफील राहिलो. ती चूक यावेळी करू नका, असे सांगत सभा मोठी आहे म्हणून बेसावध राहू नका. जोमाने काम करून समोरच्या उमेदवारांचे अनामत रक्कम जप्त होईल, या दृष्टीने विकासासाठी काम करा, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. कल्याण लोकसभेत शिवसेनेचा खासदार आहे. आपला या भागात आमदार पण पाहिजे यासाठी काम करा. आणखी काही बोलायची गरज नाही. यासाठी आपला मुलगा पुरेसा आहे, असे सांगत त्यांनी खा. शिंदे यांचे विकास कामांवरून कौतुक केले




## अनिल देशमुख यांना क्लीनचीट नाही !

### न्या. चांदीवाल यांचा दावा



**अनिल देशमुख यांना क्लीनचीट दिलेली नाही. मी माझ्या अहवालात क्लीनचीट हा शब्दच वापरला नाहीय. परमबीर सिंह यांनी जी माघार घेतली, त्याबद्दल मी माझ्या अहवालात टीका केली आहे. पण मी क्लिनचीट दिलेली नाही. साक्षी पुरावा आला नाही. अहवालात पुरावा नाही असं म्हटलं आहे. परमबीर सिंह, सचिन वाझे यांनी त्यांच्याकडे पुरावे असूनही दिले नाही. पुरावे दिले असते तर नक्कीच काही घडलं असतं, असं चांदीवल यांनी म्हटलं आहे.**

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

**मुंबई :** माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर पोलीस आयुक्त परमबीरसिंह यांनी १०० कोटींच्या वसुलीचे आरोप केले. या प्रकरणात चौकशी करणाऱ्या न्यायमूर्ती चांदीवाल यांनी आपल्या अहवालात आपण देशमुखांना क्लीनचीट दिलेली नाही असं म्हटलंय. एबीपी माझाचे ज्येष्ठ प्रतिनिधी गणेश ठाकूर यांनी न्या. चांदीवाल यांची मुलाखत घेतली... या मुलाखतीत न्या. चांदीवाल यांनी स्फोटक आणि खळबळजनक गौप्यस्फोट केलेत. योग्य पुरावे आयोगासमोर समोर येऊ दिले नाहीत असं न्या. चांदीवाल यांनी म्हटलं आहे. विशेष म्हणजे चांदीवाल आयोगाने आपल्याला क्लीनचीट दिल्यामुळेच अहवाल सार्वजनिक होऊ दिला जात नाही असा आरोप अनिल देशमुख वारंवार करतात. मात्र अनिल देशमुखांचा क्लीनचीटचा दावा न्या. चांदीवाल यांनी एबीपी माझावर सपशेल फेटाळला आहे.

गृहमंत्री असताना मुंबईचे तत्कालीन पोलीस आयुक्त परमवीर सिंग यांनी माझ्यावर १०० कोटी रुपये वसुलीचा आरोप केल्यानंतर या प्रकारणाची चौकशी करण्यासाठी न्यायमूर्ती कैलास चांदीवाल यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमण्यात आला. या संपूर्ण चौकशीनंतर आयोगाने दिलेल्या अहवालात मला क्लीन चिट देण्यात आली. मात्र राज्य सरकारने हा अहवाल मला क्लीनचिट मिळाल्यामुळे जाणीवपूर्वक दडवून ठेवला असल्याचा आरोप अनिल देशमुख वारंवार करताना दिसतात. मात्र न्या. चांदीवाल यांनी अनिल देशमुखांना क्लीनचीट दिलेली नाहीय, असा खळबळजनक दावा केला आहे.



## उद्धव आणि मी एकत्र येऊ नये यासाठी अनेकांची फिल्डिंग !

### राज ठाकरेंच्या स्फोटक विधानाने खळबळ

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ☐ प्रतिनिधी**

शिवसेनेतून बाहेर पडून राज ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण पक्ष स्थापना केला याला अनेक वर्षे लोटली आहेत, पण उद्धव आणि राज ठाकरे यांनी एकत्र यावे अशी साद मराठी माणसांनी अनेक वेळा घातली आहे. पण याबाबत दोघांमध्ये कधी चर्चा झाली झाली नाही. मात्र दोन दिग्गज नेत्यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी एकत्र यावे असा विषय अधून-मधून निघतो. पण या मुद्द्यावर राज ठाकरे यांनी निवडणुकीच्या तोंडावर स्फोटक विधान केले आहे. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहे. एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत राज ठाकरे म्हटले आहे की, उद्धव ठाकरे आणि मी एकत्र येऊ नयेत, यासाठी अनेक लोक फिल्डिंग लावत आहेत. यात काही आतले आणि काही बाहेरचे लोक आहेत. पण मी माझ्याकडून मी अलर्ट असतो. कोण काय बोलतो हे मला कळतं, पण मी त्याकडे दुर्लक्ष करतो, असे राज ठाकरे यांनी सांगितले. हिंदुत्ववादी शिवसेनेचा वर्सोव्याचा उमेदवार हारून खान असेल. त्यांचे दिंडोशीचे उमेदवार उर्दूतून पत्रके काढत असतील. काँग्रेस राष्ट्रवादीच्या व्यासपीठावरून कुठेही बाळासाहेब ठाकरेंचे नावही घेतले जात नसेल, काँग्रेसची मफलर गळयात घालून उद्धव ठाकरे फिरणार असतील तर सगळयाच गोष्टींचा व्यभिचार करण्यासाठी यांच्याकडे वेळ आहे. अशी खंतही त्यांनी यावेळी बोलून दाखवली. राज ठाकरे म्हणाले की, विधानसभा निवडणूकीत आता आमची लढाई चौघांच्याही विरुद्ध आहे. अशा पद्धतीची निवडणूक महाराष्ट्राच्या इतिहासात आजपर्यंत झाली नाही. सात पक्ष एकमेकांविरुद्ध उभे आहेत. कोण कुणाविरुद्ध निवडून येईल हे सांगता येणार नाही.

> **उद्धव ठाकरे आणि मी एकत्र येऊ नयेत, यासाठी अनेक लोक फिल्डिंग लावत आहेत. यात काही आतले आणि काही बाहेरचे लोक आहेत. पण मी माझ्याकडून मी अलर्ट असतो. कोण काय बोलतो हे मला कळतं, पण मी त्याकडे दुर्लक्ष करतो**
>
> **❍ राज ठाकरे**



## पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत खारघर आणि शिवाजीपार्कवर सभा

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई:** विधानसभा निवडणुकीच्या प्रचारानिमित्त खारघरच्या सेंट्रल पार्कमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा होणार आहे. या सभेमुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी गुरुवारी सकाळी दहा वाजल्यापासून रात्री आठ वाजेपर्यंत काही मार्गांवर वाहनांना प्रवेशबंदी आहे. मोदी आज मुंबईत दोन सभा घेणार आहेत. नरेंद्र मोदी खारघर आणि शिवाजी पार्कवर सभा घेणार आहेत. यासाठी दोन्ही ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीत बदल केले आहेत. शिवाजी पार्क परिसरातील अनेक रस्त्यावर उद्या नो पार्किंग झोन असणार आहे. तर स्वातंत्र्यवीर सावरकर मार्ग श्री सिद्धिविनायक मंदिर जंक्शन ते येस बँक पर्यंत वाहतूक बंद राहणार आहे. पर्यायी मार्गाचा वापर करण्याचा वाहतूक पोलिसांनी आवाहन केले आहे. त्यासाठी १४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजल्यापासून मध्यरात्रीपर्यंत रहदारीचे नियमन केले जाईल, असे नियमावलीत नमूद करण्यात आले आहे.



## कल्याण तालुक्यात महायुती उमेदवार किसन कथोरे यांची गावखेड्यातून प्रचार रॅली

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

भाजप महायुतीचे उमेदवार किसन कथोरे याची कल्याण तालुक्यात ग्रामीण भागात प्रचार रँलीला मोठ्या संख्येने महायुतीचे कायैकतै उपस्थित होते, दहागाव, मांजरली, आपटी, रायते, आणे, भिसोळ, घोटसई, मानिवली, गुरूवली, खडवली, आदि, गावात प्रचार रँली काढण्यात आली, मानिवली येथे महायुतीचे उमेदवार किसन कथोरे यांचे स्वागत जेसीपीच्या साहाय्याने फुलांचा वषौव करण्यात आला, तसेच खास करून लाडक्या बहीण यांनी आपला भाऊ किसन कथोरे यांच्या साठी गाणी बोलल्या व आमचा भाऊ कथोरे निवडून येणार असे सांगितले,

यावेळी उमेदवार किसन कथोरे, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, माजी नगरसेवक सुरेश भोईर, बाजार समितीचे संचालक रवींद्र घोडविंदे, अरूण जाधव,योगेश धुमाळ, दिनेश कथोरे, शिवसेना तालुका प्रमुख वसंत लोणे, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे तालुका अध्यक्ष बाळाराम कोर,सुदाम पाटील, अँड सुनील गायकर, गोवेली सरपंच पुजा जाधव, राजाराम चौधरी, संजय शेलार, मंगेश शेलार, शेखर लोणे,चिंतामण मगर, जयराम भोईर, अशोक भोईर, यांच्या सह महायुतीचे कायैकतै मोठ्या संख्येने उपस्थित होते,

# बालदिन


आजचा दिवस संपूर्ण देशात बालदिन म्हणून साजरा केला जातो. वास्तविक जागतिक पातळीवर २० नोव्हेंबरला बालदिन साजरा केला जातो. १९५४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ठरवल्यानुसार, पाहिल्यांदाच बाल दिन साजरा करण्यात आला. सर्व देशांनी लहान मुलामुलींमध्ये सांप्रदायिक आदान-प्रदान व विविध संप्रदाय वा धर्माबाबतचे सामंजस्य वाढवणे तसेच जगभरातील मुलामुलींचे आयुष्य अधिक चांगले बनवण्याची संकल्पना मान्य करून त्यादृष्टीने काम करावे हा त्या मागचा हेतू. २० नोव्हेंबर हीच तारीख निवडण्याचे कारण असे की १९५९ मध्ये याच तारखेस संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने बाल हक्कांची सनद स्वीकारली. शिवाय १९८९ मध्ये याच दिवशी बाल हक्कांच्या मसुद्यावर सह्या झाल्या. हे हक्क आतापर्यंत १९१ देशांनी मान्य केले.

भारतात मात्र १४ नोव्हेंबर रोजी बालदिन साजरा केला जातो. कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांचा हा जन्मदिवस. १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म झाला. पंडित नेहरूंना लहान मुले खूप आवडायची. ते सतत लहान मुलांच्या गराड्यात असायचे. लहान मुले हेच देशाचे भविष्य आहे. आजचा बालक उद्याचा नागरिक आहे. तो नेहमी आनंदी, उत्साही आणि सुरक्षित असायला हवा. देशातील लहान मुले सुरक्षित तर देश सुरक्षित असे ते नेहमी म्हणत. .

मुलामुलींना सुरक्षित आणि प्रेमाच्या वातावरणात वाढवले गेले पाहिजे तसेच त्यांना आपले आयुष्य फुलवण्याच्या आणि पर्यायाने देशाच्या विकासात भर घालण्याच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते. पंडित नेहरू हे स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान होते. पंडित नेहरूंना बालकांविषयी वाटणाऱ्या प्रेमाची आठवण म्हणून हा दिवस बाल दिन म्हणून साजरा केला जातो

शिवाय पंडित जवाहरलाल नेहरूंना मुलांविषयी वाटणाऱ्या प्रेम व जिव्हाळयाविषयी आदर व्यक्त करण्याचा देखील हा एक मार्ग आहे. बालकांनाही आनंद घेण्याचा, मौजमस्ती करण्याचा हक्क आहे. आजचे बालक हाच देशाचे भविष्य आहे. या बालकांमधूनच देशाचे भावी सुशिक्षित तसेच मनाने आणि शरीराने आरोग्यसंपन्न असे नागरिक तयार होणार आहेत. हा हक्क मिळालेल्या नशीबवान बालकांनी आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याची जाणीव ठेवली पाहिजे. पालकांनी ही जाणीव आपल्या मुलांमध्ये रुजवली तर भावी नागरिक सुज्ञ आणि समजूतदार बनतील त्यामुळे देशाचे भविष्य उज्ज्वल होईल. बालदिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने मुलांच्या कल्याणासाठी काहीतरी करण्याचा संकल्प केला पाहिजे. देशातील सर्व मुलामुलींना बालदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे,९९२२५४६२९५**



# तेथे कर माझे जुळती
# क्रांतिवीर लहुजी साळवे जयंती
## (१४ नोव्हेंबर १७९४ - १७ फेब्रुवारी१८८१)



आपल्या मुलुखात बलाढ्य शत्रूच्या विरोधात लढण्यासाठी वीर योद्धयांच्या परंपरा निर्माण करणाऱ्या, आगळी वेगळी क्रांती करणाऱ्या वस्ताद लहुजी साळवे यांचा इतिहास प्रेरणादायी आहे. पराक्रम गाजवणाऱ्या घराण्यात देशभक्त लहुजी राघोजी साळवे यांचा जन्म १४ नोव्हेंबर १७९४ रोजी पुरंदराच्या पायथ्याशी पेठ या गावी झाला. राघोजी साळवे आणि विठाबाई यांचे ते पुत्र होत.

देशासाठी जगणाऱ्या आणि देशासाठी मरणाऱ्या लहुजी साळवे यांच्या लढाऊ बाण्याची पार्श्वभूमी आधी पाहू. लहुजींचे आजोबा लहू मांग हे देखील शूर होते. त्यांचा इतिहास स्फूर्तीदायक आहे. लहू मांग यांना छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राऊत' ही उपाधि दिली होती. आणि पुरंदर किल्ल्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपविली होती. लहुजी यांचा जन्म मातंग कुटुंबात झाला होता.

लहुजींना युद्ध कलेचे प्रशिक्षण त्यांच्या घरातील शूरवीर अशा पुरुषांनी दिले. त्यांचे वडील राघोजी साळवे हेच मुळात युद्ध कलेत पारंगत होते. विशेष म्हणजे वाघाशी झुंज देणारे पराक्रमी पुरुष म्हणून ते नावाजले होते. जिवंत वाघाला खांद्यावर घेऊन पेशव्यांच्या राजदरबारी पेश करणारा अद्वितीय ताकदीचा पुरुष म्हणून ते नावाजले होते. राघोजी हे पेशवाईत शिकार खान्याचे प्रमुख होते. त्यांच्याकडेच शस्त्रागार खात्याची ही जबाबदारी सोपवण्यात आली होती.

पुढे ५ नोव्हेंबर १८१७ ला खडकी येथे घमासान युद्ध झाले. तब्बल बारा दिवस राघोजी आणि लहुजी या पिता-पुत्रांनी मर्द मावळयांना संगतीला घेऊन इंग्रजांविरुद्ध प्राणपणाने लढा दिला. अर्थात राघोजी साळवे जीवाच्या आकांताने इंग्रजांवर तुटून पडले. त्यांचा तलवारीने कित्येक शत्रूना यम सदनी पाठविले.

मात्र या तुफान संकटातून बाहेर पडण्यासाठी इंग्रज सैन्याने एकत्रितपणे हल्ला करून राघोजींचा घात केला. बारा दिवस चाललेल्या या युद्धात १७ नोव्हेंबर १८१७ रोजी इंग्रज सैन्याचे नेतृत्व माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन करत होता. सदर लढाईत राघोजी साळवे मारले गेले. सदर हृदय द्रावक प्रसंग पाहून लहुजी साळवे यांनी हयात भर ब्रह्मचारी राहून मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी लढण्याचा संकल्प केला त्यांनी १८२३ मध्ये पुणे शहरातील गंज पेठेत व्यायाम शाळा सुरू केली. शस्त्रास्त्रांच्या प्रशिक्षणासाठी 'गुलटेकडी' नावाच्या निर्जन परिसरातील जागा निवडली. तेथे प्रशिक्षणास आरंभ केला. वासुदेव बळवंत फडके, महात्मा ज्योतिराव फुले, आप्पासाहेब भांडारकर, विठोबा गुटाळ, गावंडे, परांजपे वगैरेंना मल्ल विद्येबरोबरच शस्त्रास्त्रे चालवण्याचे विविध ठिकाणी लहुजींनी प्रशिक्षण दिले. विविध जाती जमातीतील बंडखोरांना, दरोडेखोरांना, मांगांना, रामोशींना, भटक्या विमुक्त जमातींना एकत्र आणले. त्यांना प्रशिक्षित केले. त्यांच्या मनःपटलावर स्वातंत्र्याची बीजे रोवली. पुढे १८५७ च्या स्वातंत्र्यलढ्यात लहुजींच्या तालमीत तयार झालेले अनेक क्रांतिवीर सामील झाले होते अशी इतिहासात नोंद आहे. म्हणतात ना, There is no revolution without evolution of mankind! धन्य ते पुत्र लहुजी साळवे। धन्य ते पिता राघोजी साळवे !! धन्य ते आजोबा लहू मांग!!!



**डॉ. आनंदराव सूर्यवंशी**

# विधानसभा निवडणुकीसाठी ४२६ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी) :** दि. १४ : केंद्रीय निवडणूक आयोगाने 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापित करण्याचे आदेश दिले आहेत. यावेळी विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात ४२६ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिला करणार आहेत. महिलांचा मतदानातील सहभाग वाढविण्यासाठी 'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापन करण्यात येणार आहे.

नाशिक जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे एकूण ४५ मतदान केंद्रांचे नियंत्रण महिलांकडे असणार आहे. यानंतर जळगावमध्ये ३३, गोंदिया ३२ आणि सोलापूर २९, मुंबई उपनगरमध्ये २६ महिला नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत. तर वाशिम, सिंधुदुर्ग, गडचिरोली , हिंगोली जिल्ह्यात सर्वात कमी प्रत्येकी तीन महिला नियंत्रित मतदान केंद्र असतील.

महिला नियंत्रित मतदान केंद्रांमध्ये तैनात असलेल्या पोलिसांपासून ते निवडणूक कार्यावर असलेल्या अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह सर्वजण महिला असतील. लैंगिक समानता आणि मतदान प्रक्रियेत महिलांच्या अधिक रचनात्मक सहभागासंबंधातील वचनबद्धतेचा भाग म्हणून विधानसभा निवडणुकीसाठी महिला नियंत्रित महिला मतदान केंद्र असणार आहेत. निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व महिला नियंत्रित मतदान केंद्रात कोणताही विशिष्ट रंग वापरला जाणार नाही तसेच मतदान केंद्रातील कुठल्याही खास राजकीय पक्षाच्या रंगाचा अनावश्यक वापर होणार नाही याची काळजी घेण्यात येईल.

'महिला नियंत्रित मतदान केंद्र' स्थापन करण्याच्या निर्णयामुळे महिलांचा मतदानातील सहभाग वाढण्यास मदत होणार आहे. महिला मतदान केंद्र निवडताना केंद्राची सुरक्षितता लक्षात घेतली जाणार आहे. संवेदनशील केंद्र टाळून तहसील कार्यालय, पोलीस स्टेशननजीकच्या केंद्रांची तसेच ज्या मतदान केंद्रांवर निवडणूक प्रक्रियेतील अधिकाऱ्यांचा कायम संपर्क राहील, अशा केंद्राची या विशेष प्रयोगाकरिता निवड करण्यात येणार आहे.

जिल्हानिहाय महिला नियंत्रित मतदान केंद्र : अहमदनगर १२, अकोला ६, अमरावती ८, औरंगाबाद १३, बीड ८, भंडारा ८, बुलढाणा ७, चंद्रपूर ९, धुळे ५, जालना ६, कोल्हापूर १०, लातूर ६, मुंबई शहर १२, नागपूर १३, नांदेड ९, नंदुरबार ४, उस्मानाबाद ४, पालघर ६, परभणी ८, पुणे २१, रायगड ९, रत्नागिरी ६, सांगली ८, सातारा १७, ठाणे १८, वर्धा ९ आणि यवतमाळ ७ असे असणार आहेत.

# जिजाऊ सामाजिक विकास पार्टीच्या प्रचाराने शहापुरात धरला जोर





**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता शहापूर(प्रतिनिधी) दि.१४ :**
शहापूर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ रंगतदार अवस्थेत पोहोचली असून प्रचाराची धावपळ जोरात सुरू झाली आहे, चौका चौकात सभा, तालुक्यात जोरदारपणे प्रचार सभा, घेतल्या जात आहे तसेच तालुक्यातील मतदारांना उमेदवारांच्या भेटीगाठीचे प्रमाण वाढत आहे. ज्या ज्या पक्षाचे उमेदवार, तालुक्यातील वेगवेगळया क्षेत्रांमधील जे मान्यवर, तसेच जनता यांच्या भेटीगाठी घेत असून मतदारांना आपल्या कार्याची / कामाची पावती देत आहेत. शहापूर विधानसभा १३५ च्या जिजाऊ सामाजिक विकास पार्टीच्या अधिकृत उमेदवार रंजना उघडा, यांच्या प्रचाराने तर तालुक्यात भरारी मारली आहे. वाडा, तालुक्यात तसेच गाव - खेडे,,पाडे, वाड्या-वस्त्या,याठिकाणी मोठ्या प्रमाणात जोर आला असून, शहापुरातील प्रचारातही जोर वाढला आहे. असे असून जनता मोठ्या प्रमाणात जिजाऊला पाठिंबा देत आहे. मागे झालेल्या सार्वत्रिक लोकसभेच्या निवडणुकीत जिजाऊ सामाजिक संघटनेच्या माध्यमातून आपल्या सामाजिक कार्याच्या बळावर नुकताच पार पडलेल्या निवडणुकीत जिजाऊचे संस्थापक अध्यक्ष सर्वेसर्वा निलेश सांबरे यांनी आपले प्राबल्य दाखवले आहे. शहापूर विधानसभा मतदारसंघातून त्यांना मोठ्या प्रमाणात मते पडले होती, लोकसभेत जनतेने त्यांच्यावर दाखवलेला विश्वास आणि जिजाऊचे सामाजिक कार्ये, यामुळे निलेश सांबरे यांच्या जिजाऊ विकास पार्टीला जनतेकडून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. मंगळवार दिनांक १२ नोव्हेंबर रोजी शहापूर तालुक्यातील गोठेघर, बोरशेती, शेरेपाडा,कळंबे, वाफे , सापगाव,शिवनेरी मानगाव,धसई, शेलवली( खंडोबा )कासगाव, दोऱ्याचापाडा, हिव, खुटघर, कोळकेवाडी या अशा गावात जिजाऊ सामाजिक विकास पार्टीच्या, उमेदवार रंजना उघडा यांचा प्रचारदौरा पार पडला..

अनेक गावपाड्यांमधून रंजना उघडे यांना पाठिंबा मिळत आहे, तर जिजाऊचे सर्वेसर्वा प्रचारात केंद्रस्थानी असल्याने त्यांचा देखील मतदारांवर प्रभाव पडत असल्याचे चित्र दिसत आहे, शिलाई मशीन हे चिन्ह घेऊन जिजाऊ विकास पार्टीचे अपक्ष उमेदवार रंजना उघडा १३५ शहापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीला सामोरे जात आहेत. जिजाऊ सामाजिक विकास पार्टी सारख्या सामाजिक काम करणाऱ्या संघटनेचा एक उच्चशिक्षित व सुशिक्षित उमेदवार जर आमदार म्हणून शहापूरल मिळाला तर शहापूरचा कायापालट नक्की होईल असा विश्वास शहापूरकर व्यक्त करीत आहेत.

# मुरबाडमध्ये यंदा परतीच्या पावसामुळे भात पिकाच्या भा-यांमध्ये मोठ्या प्रमाणात घट



दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(बाळासाहेब भालेराव) दि.१४ :
मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात तसे आदिवासी व शहरी भागात यंदा परतीच्या पावसाने मोठ्या प्रमाणात शिरकाव केल्याने भात शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात नासधूस झाल्याने प्रत्येक शेतकऱ्याला आपापल्या शेतामध्ये १०० भाडे किंवा २०० भाडे किंवा त्यापेक्षा ३०० भाडे मिळायचे त्या ठिकाणी शंभरच्या भाड्या ऐवजी येथे ५५ भाडे मिळाले तर २०० भाडे ऐवजी १०० भाडे मिळाले व ३०० भाडे मिळायचे या ठिकाणी१६० भाडे मिळाले अशाप्रकारे यंदा भात पिकाच्या बाबतीत सर्वच ठिकाणी भात कापणी केल्यानंतर भाताची करपा गोळा करताना अक्षरशा मजुरांसह शेतीच्या मालकांना मोठी मेहनत घ्यावी लागली त्यानंतर करपा गोळा केल्यानंतर त्याच शेतात त्याच जागेवर भाताचे भारे बांधले जातात त्यानंतर शेतकरी वर्गांच्या लक्षात आलं यंदा परतीच्या पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने खऱ्या अर्थाने शेतामध्येच भाताची पिके आडवी पडली होती त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारे भाताचे भारे मिळायला हवे होते. तालुक्यात सुरुवातीला चांगला पाऊस पडत त्यावेळी शेतकरी वर्गाला वाटत होता की यंदा भाताचे पीक दुप्पटीने मिळणार अशा होत्या परंतु निसर्गापुढे सगळे नतमस्तक होतात याच म्हणीवरून मेघराजाने होत्याचं नव्हतं अशा प्रकारे पाऊस पडल्याने शेतीची देयनीय अवस्था झाल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे यंदा दरवर्षी भाताचे भारे शेतकऱ्याला जास्त मिळायचे परंतु यंदा परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांना भाताचे भारे कमी मिळाले आहेत.

# शशिकांत मढवी यांचे ८८ व्या वर्षी निधन

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी) दि.१४ :**
पेण तालुक्यातील वाशी येथील सागर शिक्षण मंडळाचे माजी अध्यक्ष व विद्यमान कोषाध्यक्ष शशिकांत परशुराम मढवी यांचे नुकतेच निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८८ वर्षांचे होते.त्यांच्या पार्थिवावर वाशी येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

यावेळी समाजाच्या विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते. स्व. मढवी यांनी सागर शिक्षण मंडळामध्ये काम केल्याने त्यांनी स्वतः संस्थेला आरसीसी कार्यालय इमारत बांधून दिली आहे. तसेच आतापर्यंत त्यांनी धार्मिक, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक अशा कामांसाठी सढळ हस्ते दानधर्म केले आहे. ते वनस्पती देवी पतसंस्थेचे उपाध्यक्ष देखील होते.रायगड जिल्हा सेवानिवृत्त संघटनेचे अध्यक्ष धुरंधर मढवी यांचे मोठे बंधू होते.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, सून, नातवंडे असा कुटुंब परिवार आहे.

# केवळ दर्शन व्यवस्था सुरु ठेवून अन्य प्रकारचे सर्व मनोरंजनाचे खेळ बंद करुन यात्रा भरविण्यास मनाई आदेश जारी

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता रायगड(प्रतिनिधी) दि.१४ :**
विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून १८९-कर्जत मतदार संघातील मौजे ताकई,ता.खालापूर, येथील १५ दिवस चालणारी सार्वजनिक यात्रा ही पोलीस मनुष्यबळाच्या व्यस्त दिनक्रमामुळे दि.१९ व दि.२० नोव्हेंबर २०२४ या दोन दिवसांकरिता यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्था सुरु ठेवून, अन्य प्रकारचे सर्व मनोरंजनाचे खेळ व दुकाने बंद करुन यात्रा भरविण्यास जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) मधील तरतुदीन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

दि.१२ नोव्हेंबर २०२४ ते दि.२६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मौजे ताकई, ता.खालापूर येथे धाकटी पंढरी विठ्ठल मंदीर ट्रस्ट, खोपोली नगरपरिषद व ग्रामस्थ मंडळ ताकई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यात्रेमध्ये होणारी सर्वात जास्त गर्दी ही मनोरंजनाच्या खेळांच्या ठिकाणी होत असते. त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान गर्दीचे नियोजन आणि सार्वजनिक वाहतूकीची योग्य व्यवस्था राखण्याकरीता पोलीस मनुष्यबळाच्या अतिशय व्यस्त दिनक्रमामुळे दि.१९ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मनोरंजनाच्या खेळावर आवश्यक ते प्रतिबंध ठेवणे आवश्यक असून, या यात्रेच्या कालावधीत दि.१९ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सार्वजनिक यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्थासुरु ठेवून मनोरंजनाचे सर्व खेळ व दुकाने बंद करण्यात यावीत.

मा.भारत निवडणूक आयोगाने दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित केल ा आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघामध्ये बुधवार, दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या विधानसभा मतदार संघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा याकरीता मतदान सुरळीतपणे पार पडणे आवश्यक आहे.

# दैनिक राशिफल

१४ नोव्हेंबर २०२४
गुरुवार

**मेष**
आज तुमच्या व्यक्तिमत्वात आणि स्वभावात झालेला बदल उत्कृष्ट असेल. सामाजिक आणि कौटुंबिक सदस्यांकडूनही तुम्हाला विशेष सन्मान मिळेल.

**वृषभ**
कौटुंबिक बाबींमध्ये थोडी घाई करावी लागेल. आजच्या कार्यात तुमच्या योगदानामुळे तुमचा आदर आणि सन्मान देखील वाढेल.

**मिथुन**
कोणतेही प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस योग्य आहे. कोणतीही योजना राबवण्यापूर्वी कुटुंबातील सदस्यांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क**
घरात महत्त्वाच्या व्यक्तीच्या आगमनामुळे एखाद्या विषयावर सकारात्मक चर्चा होईल. व्यावसायिक कामकाजात सुधारणा होण्याची अपेक्षा करू नका.

**सिंह**
तुमची वैयक्तिक कामेही आज बऱ्याच प्रमाणात सुरळीतपणे पूर्ण होतील.अज्ञात व्यक्तीशी जास्त संवाद साधल्याने तुमचे नुकसान होऊ शकते.

**कन्या**
ध्येय निश्चित करण्यासाठी नवीन योजना कराल, ही योजना भविष्यात प्रभावी ठरेल. आरोग्याशी संबंधित किरकोळ समस्यांमुळ आळस हावी राहील.

**तूळ**
प्रलंबित देयके गोळा करण्यासाठी आणि आर्थिक परिस्थिती मजबूत करण्यासाठी ही वेळ चांगली आहे. तुमची सर्व मेहनत आणि शक्ती तुमच्या कामात वाहून घ्याल.

**वृश्चिक**
कोणतीही खास गोष्ट कोणाशीही शेअर करू नका. ति स्वकेंद्रित असण्याने आणि अहंकाराची भावना असल्यामुळे परस्पर संबंधांमध्ये काही तणाव निर्माण होतो.

**धनु**
विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांचे पूर्ण सहकार्य मिळेल. आज तुम्ही तुमची लपलेली प्रतिभा ओळखून सर्जनशील कार्यात त्याचा वापर कराल.

**मकर**
आज तुम्हाला हे लक्षात ठेवावे लागेल की एखाद्या व्यावसायिकाशी भांडण सारखे प्रसंग उद्भवू शकतात. रागावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

**कुंभ**
तुमच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल होईल आणि तुमच्या जीवनशैलीबद्दल अधिक जागरूक राहणे इतरांच्या आकर्षणाचे केंद्र बनेल.

**मीन**
कोणतेही काम करण्यापूर्वी त्याच्याशी संबंधित माहिती घेतल्यास अधिक यश मिळेल. तुम्ही तुमची प्रतिभा ओळखाल कामाचा क्रम पूर्ण उर्जेने सांभाळाल.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
**जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली**
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
**प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!**

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# मतदान केंद्रात मोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरणास मनाई

## -जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**ठाणे दि.१३ :** भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघात एकूण ६ हजार ९५५ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. मतदान केंद्रात छायाचित्र ओळखपत्राशिवाय मोबाईल, इलेक्ट्रॉनिक उपकरण घेऊन मतदान केंद्रात प्रवेश करु नये, अशा सूचना निवडणूक आयोगाकडून देण्यात आल्या आहेत, अशी माहिती ?जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली आहे.

मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर मतदारांना त्यांचा मतदान करण्याचा हक्क अधिक प्रभावीपणे बजावता यावा यासाठी सर्व मतदारांनी त्यांचे मतदान करण्यापूर्वी, मतदान केंद्रामध्ये ओळख पटविण्यासाठी मतदार छायाचित्र ओळखपत्र सादर करणे अपेक्षित आहे. ज्या मतदारांना मतदार छायाचित्र ओळखपत्र सादर करणे शक्य होणार नाही, ते त्यांची ओळख पटविण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे आधारकार्ड, मनरेगा रोजगार पत्रक (जॉब कार्ड), बँक / टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्र असलेले पासबुक, श्रममंत्रालयाच्या योजनेअंतर्गत दिलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहरनचालक लायसन, स्थानी खाते क्रमांक (पॅनकार्ड), राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक (उघ) यांनी दिलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), केंद्र सरकार/ राज्यशासन/ सार्वजनिक क्षेत्र उपक्रम/ सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले, छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद सदस्य/ ?विधानसभा सदस्य/ विधानपरिषद सदस्य यांना दिलेले अधिकृत ओळखपत्र आणि ?विशिष्ट दिव्यांगत्वाचे ओळखपत्र (यूडीआयडी), सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालय, भारत सरकार आदी दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ करिता दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७.०० ते सायंकाळी ६.०० या कालावधीत सर्व नागरिकांनी मतदान करुन आपला राष्ट्रीय हक्क बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी केले आहे.

# क्यूआर कोड प्रणालीतून मिळणार मतदान केंद्रांची माहिती

❍ दै.ठाणे जीवनदीप वार्ता ❍

**ठाणे दि.१३:** येत्या २० नोव्हेंबर २०२४ रोजी नागरिकांना मतदानासाठी मतदान केंद्रावर जाणे सोईचे व्हावे ?किंबहुना आपले मतदान केंद्र कुठे आहे, याची माहिती क्यूआर कोडच्या माध्यमातून मिळणार आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या संकल्पनेतून जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांच्या माध्यमातून 'Locate your Polling Station' ही 'बारकोड प्रणाली' तयार करण्यात आली आहे.

मतदानाच्या दिवशी मतदाराला मतदान केंद्रावर पोहोचणे सहज शक्य व्हावे, यासाठी Locate your Polling Station ही बारकोड प्रणाली तयार करण्यात आली आहे. यामध्ये ठाणे ?जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघांसाठी असलेला क्यूआर कोड स्कॅन केल्यास त्यावर ठाण्यातील सर्व मतदान केंद्र दिसतील. त्यानंतर मतदारांनी मतदार स्लिपवरील मतदान केंद्र क्रमांक क्लिक केल्यास मतदान केंद्र कुठे आहे, किती अंतरावर आहे, तसेच मतदान केंद्राकडे कसे जायचे याचा गुगल मॅप उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नागरिकांना सहजरित्या पोहचता येणार आहे.

मतदाराला मतदान केंद्रापर्यंत जाणे सहज सोपे व्हावे व हे क्यूआर कोड मतदारांपर्यंत पोहचावे, यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन व जिल्हा माहिती कार्यालयाकडून फेसबुक, इन्स्टाग्रॅम, एक्स (ट्विटर), युट्यूब तसेच व्हॉट्स?पच्या माध्यमातून याची व्यापक प्रमाणात प्रसिद्धी करण्यात येत आहे, असे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी कळविले आहे.

# आवक वाढल्याने भाज्यांच्या दरात घसरण

दै.जीवनदीप वार्ता ठाणे

**नवी मुंबई :** वाशीतील एपीएमसी घाऊक भाजीपाला बाजारात भाज्यांची आवक वाढल्याने दरात घसरण झाली आहे. मात्र कोबीची मागणी वाढली असल्याने दर चढेच आहेत. बाजारात भाज्यांची आवक वाढली असून विशेषतः टोमॅटो, शिमला मिरची हिरवी मिरची, फ्लॉवर या भाज्यांचे दर गडगडले आहेत.

परतीच्या पावसामुळे भाज्यांचे उत्पादन घटले होते. त्यामुळे एपीएमसी घाऊक बाजारात भाज्यांची आवक घटल्याने भाजीपाल्याच्या दरात वाढ झाली होती. परंतु बाजारात आता भाज्यांची आवक वाढत असून सोमवारी बाजारात ६२८ गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यामुळे भाज्यांचे दर गडगडले आहेत. त्यामुळे टोमॅटो, शिमला मिरची हिरवी मिरची ,फ्लावरच्या दरात प्रतिकिलो १०-२० रुपयांनी घसरण झाली आहे. तर कोबीचे दर मात्र चढेच आहेत. एरव्ही कोबी प्रतिकिलो ८-१०रुपयांनी उपलब्ध असते मात्र परराज्यात कोबीची मागणी वाढल्याने दर वधारले आहेत.

# खालापुरातील ताकई यात्रेवर बंदी

## भाविकांसाठी केवळ दर्शनास मुभा

दै.जीवनदीप वार्ता ठाणे

**पेण :** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या अनुषंगाने सुरक्षितता, कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीकोनातून १८९-कर्जत मतदार संघातील मौजे ताकई,ता.खालापूर, येथील १५ दिवस चालणारी सार्वजनिक यात्रा ही पोलीस मनुष्यबळाच्या व्यस्त दिनक्रमामुळे दि.१९ व दि.२० नोव्हेंबर २०२४ या दोन दिवसांकरिता यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्था सुरु ठेवून, अन्य प्रकारचे सर्व मनोरंजनाचे खेळ व दुकाने बंद करून यात्रा भरविण्यास जिल्हादंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे यांनी बाजार व जत्रा अधिनियम, १८६२ चे कलम ५ (ग) मधील तरतुदीन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

१२ नोव्हेंबर २०२४ ते दि.२६ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मौजे ताकई, ता.खालापूर येथे धाकटी पंढरी विठ्ठल मंदीर ट्रस्ट, खोपोली नगरपरिषद व ग्रामस्थ मंडळ ताकई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित यात्रेमध्ये होणारी सर्वात जास्त गर्दी ही मनोरंजनाच्या खेळांच्या ठिकाणी होत असते. त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रियेदरम्यान गर्दीचे नियोजन आणि सार्वजनिक वाहतूकीची योग्य व्यवस्था राखण्याकरीता पोलीस मनुष्यबळाच्या अतिशय व्यस्त दिनक्रमामुळे दि.१९ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत मनोरंजनाच्या खेळावर आवश्यक ते प्रतिबंध ठेवणे आवश्यक असून, या यात्रेच्या कालावधीत दि.१९ नोव्हेंबर ते दि. २० नोव्हेंबर २०२४ या कालावधीत सार्वजनिक यात्रेच्या ठिकाणी केवळ दर्शन व्यवस्थासुरु ठेवून मनोरंजनाचे सर्व खेळ व दुकाने बंद करण्यात यावीत.

भारत निवडणूक आयोगाने दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या प्रसिध्दी पत्रकान्वये महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित केला आहे. या कार्यक्रमानुसार रायगड जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघामध्ये बुधवार, दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या विधानसभा मतदार संघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, मतदाराला आपला मतदानाचा हक्क बजावता यावा याकरीता मतदान सुरळीतपणे पार पडणे आवश्यक आहे.

# "ठाणेकरांनो एकदा मला संधी द्या !"

## मनसेच्या अविनाश जाधवांचे ठाणेकरांना साकडे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे शहर विधानसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार अविनाश जाधव यांनी मंगळवारी सकाळी ठाणे रेल्वे स्थानकात हटके प्रचार केला.

'ठाणेकरांनो एकदा मला संधी द्या! अशा आशयाचे फलक हाती घेऊन अविनाश जाधव यांनी ठाणेकरांना साकडे घातले. यावेळी रेल्वे प्रवाशांशी संवाद साधुन अविनाश जाधव यांनी रेल्वे संदर्भात समस्या जाणुन घेतल्या. दरम्यान, अविनाश जाधव यांच्या हटके प्रचाराची रेल्वे प्रवाशांमध्ये जोरदार चर्चा सुरू आहे.




भारतात पहिली रेल्वे बोरीबंदर (मुंबई) ते ठाणे स्थानकादरम्यान धावली. अशा या ऐतिहासिक ठाणे रेल्वे स्थानकातून दररोज लाखो प्रवासी नोकरी आणि व्यवसायानिमित्त प्रवास करतात. ठाणे स्थानकाचा पश्चिमेकडील भाग ठाणे शहर विधानसभा क्षेत्रात येत असल्याने स्टेशन परिसर ते नौपाडा, जुने ठाणे या भागात नेहमीच वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे ठाणे स्थानक परिसरात मुबलक पार्किंग सुविधांसह या भागाचा सुनियोजित विकास होणे गरजेचे असल्याचे मत प्रवाश्यांनी यावेळी व्यक्त केले. त्यावर अविनाश जाधव यांनी 'एकदा मला संधी द्या' असे नम्र आवाहन ठाणेकरांना केले.

आज सकाळी प्रचार करताना रेल्वेने प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांमध्ये अविनाश जाधव यांची क्रेझ पाहायला मिळाली. विशेष म्हणजे तरुणांमध्ये उत्साह पाहायला मिळाला. यावेळी महिला,तरुण वर्गाला जाधव यांच्या सोबत सेल्फी काढण्याचा मोह काही आवरला नाही. तसेच येत्या २० नोव्हेंबर रोजी मतदान करण्याचा विश्वास मतदारांनी व्यक्त केला. ठाणे स्थानकातील फलाट क्रमांक १ व २ समोरील सॅटीस पुलाखाली अविनाश जाधव यांनी मंगळवारी सकाळी ८ वाजता प्रवाशांसोबत संवाद साधला. याप्रसंगी, मनसेचे नेते अभिजित पानसे, मनसेचे ठाणे शहर अध्यक्ष रविंद्र मोरे, ठाणे महिला अध्यक्षा समिक्षा मार्कंडे आदींसह शेकडो महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

## 'राजपुत्र' अमित ठाकरेंसाठी

# ज्येष्ठ अभिनेते संजय मोने यांची लक्षवेधक फेसबुक पोस्ट



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबईः** महाराष्ट्रात सध्या राजकीय मंचावर मराठी कलाकाराची उपस्थिती हे चित्र फारच सामान्य झाले आहे. विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत अनेक कलाकार त्यांच्या त्यांच्या लाडक्या पक्षांच्या प्रचारासाठी मैदानात उतरलेत. या कलाकारांच्या सोशल मीडियावरील पोस्ट किंवा त्यांची राजकीय मंचावरील भाषणेदेखील चर्चेचा विषय ठरतात. अशावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांच्या प्रचारासाठीदेखील बडे कलाकार सरसावले आहेत. मनसे अध्यक्ष राज ठाकरे स्वबळावर विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले असून १३५ जागांवर उमेदवार उतरवले आहेत. यामध्ये मुंबईतील माहीम मतदारसंघात स्वतः 'राजपुत्र' अमित ठाकरे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यांच्यासाठी ज्येष्ठ अभिनेते संजय मोने यांनी केलेली फेसबुक पोस्ट लक्ष वेधून घेणारी ठरली.

माहीममधील या लढतीबद्दल बोलायचे झाल्यास, अमित ठाकरे यांना महायुतीकडून पाठिंबा मिळेल की काय, अशी चर्चा सुरुवातीला होती. भाजपमधील काहींनी तशी मागणीही शिवसेनेकडे केलेली. शेवटच्या क्षणापर्यंत सदा सरवणकर उमेदवारी अर्ज मागे घेतील अशी चर्चा होती, मात्र तसे घडले नाही. त्यामुळे या मतदारसंघात मनसेकडून अमित राज ठाकरे, शिवसेना ठाकरे गटाकडून महेश सावंत आणि महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे सदानंद सरवणकर अशी तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे.

## मतदारांचा सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने

# आज ठाणे जिल्ह्यात सामूहिक मतदान शपथ उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

☐ प्रतिनिधी

**ठाणे ,दि.१३ :** मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी नाविन्यपूर्ण आणि प्रभावी मतदार जागृती धोरणांच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून, ठाणे जिल्ह्याने मतदारांचा सहभाग आणि नागरी सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू केला आहे.

स्वीप कार्यक्रमांतर्गत दि.१४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता संपूर्ण ठाणे जिल्ह्यात सुमारे एक कोटी नागरिक एकाच वेळी, आहेत त्या ठिकाणी मतदानाचा हक्क बजावण्याची सामूहिक शपथ घेण्याचा कार्यक्रम जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनात ठाणे, नवी मुंबई, मिरा भाईंदर, वसई विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त व इतर सर्व पोलीस अधिकारी व कर्मचारी, सर्व महानगरपालिकांचे आयुक्त व त्यांचे अधिकारी-कर्मचारी, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, ठाणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी संदिप माळवी, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी हर्षल गायकवाड, नवी मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर, भिवंडी निजामपूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी विठ्ठल डाके, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे उपायुक्त आणि स्वीपचे नोडल अधिकारी संजय जाधव, उल्हासनगर महानगरपालिकेचे उपायुक्त किशोर गवस, जिल्हा माहिती अधिकारी आणि एकत्रित माध्यम कक्षाचे नोडल अधिकारी मनोज शिवाजी सानप, तहसिलदार उज्वला भगत, प्रदीप कुडाळ, स्मिता मोहिते, नायब तहसिलदार स्मितल यादव, जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका, ठाणे सिटीझन फाऊंडेशनचे कॅस्बर ऑगस्टिन, विविध अशासकीय संस्था (एनजीओ), शैक्षणिक संस्था आणि स्थानिक संस्था या ऐतिहासिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अथक परिश्रम घेत आहेत.

जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करण्यासाठी आणि संपूर्ण जिल्ह्यात जनजागृती करण्यासाठी संपूर्ण ठाणे जिल्ह्यात वाहने, संस्था आणि एजन्सीद्वारे सायरनचा वापर करणे, हे या कार्यक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य असेल. नियोजित वेळेत सामूहिक संकल्प उपक्रमात सामील होण्यासाठी सायरन नागरिकांना आठवण देण्याचे काम करतील. याशिवाय, शपथेचा मजकूर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे डिजिटल पद्धतीने वितरित केला जाईल, याची खात्री करून प्रत्येक नागरिकाला प्रतिज्ञेमध्ये प्रवेश मिळेल आणि स्थान काहीही असले तरी तो सहभागी होऊ शकेल. तंत्रज्ञानाच्या या वापराचे उद्दिष्ट अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचणे आणि व्यापक सहभाग सुनिश्चित करणे हा आहे.

तरी, ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान जनजागृतीकरिता आयोजित या ऐतिहासिक उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा निवडणूक प्रशासन आणि स्वीप कक्षाने केले आहे.

# मतदानापूर्वी ठाणे जिल्हा पोलिसांकडून विशेष 'साफसफाई'

**अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ४१ तर तडीपार केलेल्या ४७ गुंडांना अटक**

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी शनिवार, ९ नोव्हेंबर रोजी ऑल आऊट ऑपरेशन राबवले. हे ऑल आऊट ऑपरेशन आयुक्तालयातील पाचही झोनमध्ये राबवण्यात आले. या ऑपरेशन कारवाईत एकूण ३१२ अधिकारी आणि एक हजार २८८ पोलीस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. या कारवाईमध्ये अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ४१ आरोपींना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत.

**ठाणे पोलिसांची मोठी कारवाई**

ठाणे पोलीस आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेच्या वेगवेगळ्या दहा पथकांनी रात्री ११ ते पहाटेपर्यंत हे ऑल आऊट ऑपरेशन राबवण्यात आले. त्यात ठाणे, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी आणि अंबरनाथ परिसरातील रेकॉर्डवरील गुन्हेगारांची तपासणी करून त्यांची पोलिसांनी चौकशी केली. या ऑपरेशनवेळी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या ४१ आरोपींना अटक करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले.

**दारू, शस्त्रास्त्र जप्त**

यावेळी ३१ गावठी कट्टे, सात कोयते, पाच तलवारी असे हत्यार जप्त करण्यात आले. तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्यांवर १७९ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. या व्यतिरिक्त दारूबंदी कायद्यानुसार ५७ गुन्हे दाखल करण्यात आले असून १८५ जणांवर कारवाई करण्यात आली. तर पाच लाख ७ हजार रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली. माजी आमदाराच्या भावनिक पत्राने मतदारसंघातील वातावरण टाईट; मतदानाच्या आधी घेणार निर्णय

**१५ नशेबाज जाळ्यात**

ड्रग्ज विक्री आणि सेवन करणाऱ्या विरोधात धडक कारवाई मोहीम राबवण्यात येऊन १५ जणांवर कारवाई करण्यात आली. पाच तास सुरू असलेल्या या मोहिमेत ७४ हॉटेल, ६४ लॉज, ३९ बियर बार, ४२ डान्सबार आदींची तपासणी करून झाडाझडती घेण्यात आली. तसेच एकूण ४७ तडीपार गुंडांना अटक करण्यात आली.

# दीड महिन्याच्या बालिकेची विक्री

## पोलिसांच्या प्रंगावधानाने अनर्थ टळला अनर्थ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** कल्याण रेल्वे स्थानक परिसरात भीक मागून उदरनिर्वाह करणाऱ्या एका महिलेवर तिच्या दीड महिन्याच्या बालिकेची विक्री करण्याचा प्रसंग ओढावला. या बालिकेच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार चार लाख रुपयांना ठरला. मात्र मुळात असा व्यवहार बेकायदेशीर असल्याचे कळताच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाने बालिकेची विक्री करणाऱ्या भिक्षेकरी आईसह डोंबिवलीतील तीन जणांना कल्याण पश्चिमेतील सहजानंद चौकात मंगळवारी सापळा रचून अटक केली. वैशाली किशोर सोनावणे (३५, रा. सिध्दार्थनगर झोपडपट्टी, कोपर रोड, डोंबिवली-पश्चिम) या दलाली करणाऱ्या महिलेच्या माध्यमातून हा खरेदी-विक्री व्यवहार सुरू होता. वैशाली ही मूळची मालेगावची रहिवासी आहे. रेखा बाळू सोनावणे (३२) ही विक्री व्यवहारातील बालिकेची आई आहे. रेखा ही कल्याण पश्चिमेकडे असलेल्या रेल्वे स्थानक भागात राहते. या प्रकरणात महात्मा फुले चौक पोलिसांनी किशोर रमेश सोनावणे (३४) या रिक्षावाल्याला देखील अटक केली आहे.

# 'जिजाऊ'चे उमेदवार नरेश धोडी यांच्या प्रचारासाठी निलेश सांबरे मैदानात

दै.जीवनदीप वार्ता ठाणे

☐ ऋषीकेश जाधव

**पालघर :** १३१ बोईसर विधानसभेचे अधिकृत उमेदवार नरेश धोडी हे जिजाऊ संघटनातून बोईसर विधानसभेला उभे असून बोईसर विधानसभेमध्ये जिजाऊ संघटनाचे अध्यक्ष निलेश सांबरे यांच्याकडून जोरदार प्रचार करण्यात येत आहे. जिजाऊ संघटना ही शिक्षण, आरोग्य सेवा, शेती, क्रीडा आणि महिला सक्षमीकरण अशा अनेक क्षेत्रांमधून जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था समाजामध्ये अमूल्यगस्त बदल घडविण्याचा प्रयत्न करत आहे. जात धर्म न पाहता हा समाज माझा आहे.छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी निलेश सांबरे गोरगरिबांसाठी काम करत आहेत. पण राजकीय व्यवस्था ही गरिबांना गरीब आणि श्रीमंतांना आणखी श्रीमंत करण्यात लागलेली आहे. स्थानिकांचे हक्क दाबले जात आहेत व आपल्या पात्र लोकांना डावलून टक्केवारी साठी टकलादु लोकांना कामे दिली जात आहे. स्थानिकांना





कामापासून वंचित ठेवले जात आहे. म्हणून येत्या निवडणुकीत विधानसभेमध्ये चांगले लोकप्रतिनिधी पाठवून तयार करायचे? निवडणुका लढवून ही भ्रष्ट व्यवस्था उलथून जनतेवरील अत्याचार संपवण्याचा निर्धार जिजाऊ संघटनेचे अध्यक्ष निलेश सांबरे यांनी केला आहे. म्हणून जिजाऊ संघटनेच्या मार्फत नरेश धोडी यांना बोईसर विधानसभे मधून उमेदवारी देण्यात आली आहे. नरेश जोडी यांची नागरिकांच्या समस्यासाठी नेहमीच धडपड असते. जिजाऊ संघटनाच्या मार्फत शेतकरी बांधवांसाठी त्यांच्या समस्या सोडवण्याची नेहमीच मदत करत असतात. रोजगार, आरोग्य, कृषी महिला सक्षमीकरण या क्षेत्रात कार्यरत असतात. जिजाऊ संघटनेच्या माध्यमातून रात्रंदिवस नरेश धोडी हे कधीही कार्यरत असतात. जिजाऊ संघटनेचे काम आणि नरेश धोडी यांचे काम बघून युवा पिढी कडून, नरेश धोडी यांचा जोरदार प्रचार करण्यात येत आहे. नरेश धोडी यांनी सांगितलं की जिजाऊ संघटनाचे अध्यक्ष निलेश सांबरे ह्यांनी माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासाने मी आणखी जोरात काम करेल. मी आमदार म्हणून निवडून आलो तर जास्तीत जास्त मी रोजगार, आरोग्य, महिला सक्षमीकरण, शिक्षण याच्याकडे लक्ष देणार.

निलेश सांबरे ना साधा सरपंच, ना आमदार, ना खासदार नसताना सुद्धा निलेश सांबरे यांनी गरिबांसाठी १०० ते १५० खाटांचा मोफत रुग्णालय, अकॅडमी, क्लिनिक, गरीब गरजूंना मोफत शिक्षण, क्रीडा, दहा ते बारा मोफत ?म्बुलन्स,महिला सक्षमीकरण असे अनेक काम जिजाऊ संघटनेच्या मार्फत करण्यात येत आहे. आतापर्यंत पदावर असलेले, यांनी आमच्यासाठी जितक केलं नाही ते निलेश सांबरे हे गोरगरिबांसाठी करत आहेत. निलेश सांबरे ह्याच गोरगरिब जनतेच साठी करत असून आज बोईसर विधानसभा क्षेत्रातील मनोर विभागातील सुप्रीम हॉटेल येथे झालेल्या प्रचार बैठकीमध्ये शेकडोच्या संख्येने उपस्थित मनोर शहरातील मुस्लिम समाज बांधवांनी जिजाऊ संघटनेमध्ये जाहीर प्रवेश केला आणि आगामी विधान सभा निवडणुकीमध्ये जिजाऊ संघटनेचे अधिकृत उमेदवार नरेश धोडी यांना मतदान करून भरघोस मतांनी विजयी करण्याचा संकल्प केला. या प्रवेश सोहळयाला जिजाऊ संघटना पालघर जिल्हा महिला सक्षमीकरण प्रमुख हेमांगी ताई पाटील,बोईसर विधान सभेचे उमेदवार नरेश धोडी , जव्हार अर्बन बँकेचे चेअरमन निलेश पाटील, पालघर तालुका ग्रामीणचे अध्यक्ष जयेश पाटील,मंजूर भाई पटेल प्रामुख्याने उपस्थित होते.

या प्रसंगी अबरार भाई,अकील भाई,काफिल भाई,पूर्वा भाई,सोहेल भाई आदींनी प्रवेश केले. तसेच या प्रसंगी ,सुजय जाधव, आदेश पाटील,अक्षय घरत,अझहर शेख, तौसीफ पठाण,मुज्जु भाई, आदी उपस्थित होते.

# विरोधकांना धडकी भरलीय

## भरत गंगोत्री अपक्ष तुल्यबळ लढणार अन जिंकणारही - सोनिया धामी



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता उल्हासनगर(प्रफुल केदारे) दि.१४ :** विधानसभा मतदारसंघात १४१ मध्ये आयलानी - कलानी लढतीचा गाजावाजा होत असला तरी भरत गंगोत्री राजवानी यांच्या प्रचाराचा जोर वाढुन सिंधी भाषिकांसमोर हा तिसरा पर्याय म्हणून जागा निर्माण करत आहेत. त्यांचा मतदारांशी वाढता जनसंपर्क पाहता विरोधकांना धडकी भरलीय. गंगोत्री यांचा विजय निश्चित होत असल्याने विरोधकांनी मतदारांमध्ये संभ्रम निर्माण करण्यासाठी अफवा पसरावायला सुरूवात केलीय. पण मतदार सुज्ञ आहेत. ते अफवांचे बळी ठरणार नाहीत असा विश्वास गंगोत्री वेल्फेअर असोसिएशनच्या अध्यक्ष सोनिया धामी यांनी एका पत्रकार परिषदेत मतदारांना दिलाय.

विधानसभा निवडणुका जाहीर होताच भरत गंगोत्री यांनी अजित पवार गट महायुतीतून तिकीट मागितले होते. परंतु, ते न मिळण्याचे संकेत पाहता अपक्ष निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आणि उमेदवारी अर्ज मागे न घेता आपल्या प्रचाराची जय्यत तयारी सुरू केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे नेते प्रमोद हिंदूराव यांनी एका मेळाव्यात पत्रकारांशी बोलतांना, आम्ही भरत गंगत्री यांची समजूत काढू आणि लवकरच महायुतीचे सर्व घटक एकाच मंचावर दिसतील असं सुतवाच केलं होतं. परंतु, हिंदुराव हे भरत गंगोत्री यांची समजूत काढण्यात अपयशी ठरले. म्हणूनच मतदारांनी अशा कोणत्याही वक्तव्यावर विश्वास ठेवु नये .भरत गंगोत्री यांची कुणाशीही युती नाहीय. गंगोत्री हे कुणाच्या ही सांगण्यावरून हि निवडणूक लढवत नाही. तर स्वतंत्रपणे अपक्ष स्वतःच्या हिमतीवर निवडणूक लढवत आहे हा विश्वास कायम मतदारांनी ठेवावा आणि त्यांच्या पाठीशी ठामपणे उभं रहावं असं आवाहनही धामी यांनी केलंय.

# अराजकता पसरवण्याचे पद्धतशीर प्रयत्न

**महाराष्ट्रसह देशात अराजकता पसरवण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. हे एक व्यापक कारस्थान आहे. अराजकता का निर्माण केली जात आहे आणि त्यामागे कोण आहे हे समजून घेणे आवश्यक आहे.**

संघर्षातील नैतिकता ज्यावेळी संपते त्यावेळी अराजकता हे पाठीवर वार करण्यासाठी वापरण्याचे अरज असते आणि सद्यस्थितीत म्हणजे साधारण २०१४ पासून विरोधकांनी विफलतेतून हे अस्त्र मुख्य अस्त्र म्हणून वापरण्यास सुरुवात केली आहे २०१४ पासून विरोधकांकडे परिस्थिती पालटू शकेल असा नेता नाही, सामान्य जनांपर्यंत पोहोचू शकते अशी संघटन शक्ती नाही, समाज एखाद्या ध्येयाच्या मागे उभा राहील असे तत्वज्ञान किंवा ध्येयवाद नाही आणि त्यामुळे वैफल्यग्रस्त विरोधकांना अराजकता एवढे एकच अस्त्र ऐष्ट्री टॉवरमध्ये बसणारे विचारवंत देत असतात. भारतातील जनसामान्य त्याचा अनुभव घेत आहेत जगाच्या पाठीवर कोठेही व कितीही प्रयत्न केले तरी सर्व जन हिताय, सर्व जन सुखाय असे घडत नसते. एवढेच कशाला बहुजन हिताय बहुजन सुखाय सुध्दा परिपूर्णपणे घडत नाही त्यासाठी आवश्यक ते प्रयत्न जरूर सुरू असतात, त्यात यशही येत असते. मात्र तसे अव्याहत प्रयत्न करूनही समाजात दुःख, वेदना या रहातच असतात आणि त्याचे वेळोवेळी प्रकटीकरणही होत असते हीच ती वेळ व संधी असते, अराजकता रुपी कलीला समाजजीवनात प्रवेश करुन ते समाजजीवन विषमय करण्याची भारत याला अपवाद नाही. पण भारतात धर्म हे समाज धारणेचे मुख्य अंग असल्याने स्वाभाविक हजारो वर्षांपासून संयम व विवेक या गुणद्वयावर समाज वर्तन अवलंबून राहिले. अराजकता हे भारताचे मुख्य अस्त्र बनले नाही पण २०१४ पासून परिस्थिती बदलली भारतात धर्म संस्कार म्हणजे हिंदू संस्कार असतात. पण २०१४ पासून देशातील सरकार विरोधी भूमिका ज्यांना घ्यावी लागली ते वैचारिकदृष्टया कधीही हिंदू जीवनपद्धती आणि संस्कार पद्धती स्वीकारू शकले नाहीत. त्यामुळे शांत, संयमाने संघर्ष करत परिस्थिती पालटू असे कधीही विरोधकांना वाटले नाही आणि त्यामुळे लवकरच वैफल्यग्रस्तता आली. स्वाभाविकपणे अराजकतेचा आधार घेण्यासाठी ते अगतिक झाले अराजकता पसरविण्यासाठी आंदोलने, त्यातील प्रक्षोभकता, त्यातील विषयांतरे, परदेशी पैसा, परदेशी मदतीवर चालणाऱ्या स्वयंसेवी संख्या, सामान्यांची अडवणूक, समाज विणीवर अनावश्यक आक्रमण, विविध समाजमाध्यमे व करमणूक क्षेत्र यांची मदत घेऊन अपप्रचार असे अनेक पदर तपासताना आंदोलनातून फक्त असंतोष निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे हे सहजपणे कळते.

अशी यादीच बनवता येईल की ही आंदोलने का झाली. यामागे कोण होते? त्या आंदोलनांचे पुढे काय झाले? शाहीनबागमध्ये आंदोलन झाले आणि त्या काळातील सर्वच आंदोलने रस्ते अडवणारी अशीच झाली. महिनोनमहिने रस्त्यावर मुक्कामी महिला, पुरुष होते.

मुस्लिम महिलांना स्वतःच्या तलाक सारख्या शहाबानो प्रकरणात आंदोलन जमले नाही पण नागरिकत्व कायदा येताच आकाश कोसळल्या सारख्या मुस्लिम महिला रस्त्यावर आल्या. अशाप्रकारच्या आंदोलनासाठी कोण पैसे देत होते? कोण गर्दी करत होते. कोण भाषणबाजी करत होते? कोणाच्या मुलाखती छापल्या जात होत्या. शेतकरी आंदोलन झाले. दिल्ली घेरली गेली.

त्यातही सर्व व्यवस्था कोण करत होते. २६ जानेवारीला राष्ट्रध्वज जाळण्याचा प्रयत्न झाला. परदेशात बातम्यांची धूम. कधी सरकार कृती करते व कधी आम्ही जगभर रान पेटवतो असा दबा धरून बसलेली जगभरची प्रसिद्धी माध्यमे. या आणि अशा अनेक आंदोलनांच्या, हेतूतः केलेल्या विविध संघर्षात्मक कार्यक्रमांमागील नेमका उद्देश स्पष्टपणे देशात अराजकता पसरवणे हाच होता.


काय गंमत असते अशा आंदोलनाची तेही लक्षात घ्यावे लागेल. आंदोलन शेती कायद्या संदर्भात आणि घोषणा खालीस्तानच्या. झेंडे खालीस्तानचे. अस्वस्थता कॅनडात आणि सर्व माध्यमे फक्त मोदींना घेरले की नाही या चिंतेत. अमेरिकेत भारतीय लोकशाहीची चिंता, परिसंवाद आणि आणखी काही.अशी आंदोलने फटाक्यांच्या माळेसारखी सुरु ठेवायची आणि नंतर व्यवस्थाच नको हा आक्रोश करायचा, अशी त्याची पद्धती आहे. हे झाल्यानंतर सामान्य माणूस व्यवस्थे विषयी चिंतित झाला की अराजकता निर्माण होते. मग कुठेही काडी टाका, भडका उडालाच पाहिजे. महाराष्ट्रात आरे कार शेड विषय आला की स्वयंघोषित पर्यावरणवादी आणि त्यांच्या मागे चर्चने गोळा केलेली गर्दी. परदेशी पैशानी पोसलेल्या स्वयंसेवी संस्था अशावेळी एकदम कृतिशील होतात. न्यायाल याने सरकारच्या बाजूने निकाल दिला. त्या निकालानंतरही त्यांचे समाधान होत नाही. यात नेमका अराजक निर्माण करणाऱ्यांचा काय रस असतो? एकदा विकास थांबला की जनमत तापते आणि त्यासाठी हा अट्टाहास असतो. त्यामुळे अशी वेगवेगळी कारणे उभारून अराजकता निर्माण करायची म्हणजे विकास थांबतो, राष्ट्रीयत्व बदनाम होते. इस्लाम व ख्रिश्चनिटीच्या अराष्ट्रीय कृत्यांकडे कानाडोळा होतो, असे हेतू आहेत.

एकदा हे घडले की लोकप्रिय सरकार जाते आणि बिनबुडाचे सरकार येते. या आंदोलन जिवींची चांदी होते. भारत सशक्त बनू नये म्हणून काम करत असलेल्या परदेशी उपद्रवींचा उद्देश सफल होतो. मग जॉर्ज सोरेस, ग्रेटा अशा टूलकिटसची कामे सोपी होतात. हे घडू लागले की हिडनबर्गला अडाणी भारताला बुडवणार असा साक्षात्कार होतो. सामान्य गुंतवणूकदार घाबरू लागतो. मग राहुल गांधी अदानी अंबानी ही प्लेट वाजवू लागतात. अराजकता झिंदाबाद अशी वाटचाल सुरू होते. त्यात मग संविधान धोक्यात हे व्यवस्थेविरुद्धचे महत्त्वाचे अस्त्र बाहेर पडते. दुरान्वयानेही ज्यांनी संविधानाचा आदर केला नाही तेही या वहात्या गंगेत हात धुवून घेतात. अशा शेकडो अदृश्य हातांनी देश, संस्कृती आणि स्थैर्य तसेच शांतता आणि समृद्धी, विकास यावर अराजकतेचा घाला येतो.

हे सामान्य जनतेने ओळखले पाहिजे. भारताचे जगातील सध्याचे स्थान, देशाची गंगाजळी, देशातील भ्रष्टाचारावर येत असलेले नियंत्रण, होणारा चौफेर विकास हे कोणाला नको आहे, हे समजून घेतले पाहिजे. काही मंडळी परदेशात जाऊन देशाची प्रतिमा मलीन का करतात? याचे कारण हेच आहे की नेतृत्व नाही, संघटन नाही, ध्येयवाद नाही मग उरतो एकच मार्ग, अराजकता निर्माण करण्याचा, असंतोष निर्माण करण्याचा, मी काही करणार नाही पण तुझ्या कोणत्याही प्रयत्नांना बदनाम करून ते हाणून पाडीन, असा हा प्रकार आहे. पण सामान्य माणूस ओळखून आहे की अशी जी आंदोलने होतात ती निवडणूक संपली की संपून जातात, आरे कार शेड उभी राहण्यास अडीच वर्षे उशीर झाला, कोकणातील प्रकल्प सुरु झाले नाहीत याचे उत्तरही तो शोधतो. अराजकता हिंदू स्वभावा विरुद्ध आहे आणि म्हणूनच भारतात अराजकता जिंकू शकत नाही. तरीही लोकांनी सावध रहाणे गरजेचे आहे.

# मुरबाड तालुक्यात शांतता व सुव्यवस्था टिकविण्यासाठी आमदार कथोरेंचीच गरज आहे

## - दिनेश उघडे



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाडि(दिलीप पवार) दि.१४ :** २००९ पासून किसन कथोरे मुरबाड विधानसभेचे आमदार झाल्यापासून मुरबाड तालुक्यात शांतता नांदत आहे. गावा गावातील भांडणे, दोन समाजातील वाद बंद झाले असून तालुका विकासाकडे वाटचाल करत आहे.

२००९ पुर्वी तालुक्यात भयावह परिस्थिती होती. प्रत्येक निवडणुकीला भांडणे ही ठरलेली असायची , मार खाणारे जेल मधे व मारणारे मोकाट अशी भयावह परिस्थिती आपण अनुभवली आहे. परंतु आमदार कथोरे यांनी तालुक्यात सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्याचे महत्वाचे काम केले असल्याने पुन्हा एकदा मुरबाड कर जनतेने विकास पुरुष किसन कथोरेंच्या पाठिशी ठामपणे उभे राहण्याचे ठरविले असल्याचे मत मुरबाड रिपाईचे तालुका अध्यक्ष दिनेश उघडे यांनी व्यक्त केले आहे. तालुक्यातील बौद्ध वस्त्यांसाठी कधी नव्हे एवढा निधी कथोरे साहेबांनी रस्ते व इतर विकास कामांसाठी दिला आहे. रमाई योजनेतून घरकुलांचा इष्टांक मोठ्या प्रमाणात देऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. बदलापूर सोनिवली येथे डॉ. बाबासाहेबांचे भव्य स्मारकाची उभारणी आमदार कथोरेंनी केली आहे. तालुक्यात भविष्यात अनेक महत्वाचे विकास प्रकल्प पुर्णत्वास जाण्यासाठी आमदार कथोरेंची या तालुक्याला गरज आहे. विरोधकांकडे सांगण्या सारखे काहीच नाही त्यांना कथोरे साहेबांवर टिका करण्याचा अधिकार नाही. तालुक्यात जो काही विकास झालाय तो स्वर्गीय घोलप साहेबांनी व कथोरे साहेबांनी केला असल्यामुळे पुन्हा एकदा बौद्ध समाजासह सर्व समाज कथोरे साहेबांना पाचव्यांदा विक्रमी मताधिक्याने विधानसभेत पाठवतील असा ठाम विश्वास पत्रकारांशी बोल ताना व्यक्त केला.

# शिवसेनेचे उमेदवार दिपेश म्हात्रे यांचा महाविकास आघाडीचा वचनबद्ध जाहीरनामा सादर



**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता डोंबिवली(प्रतिनिधी) दि.१४ :** १३ नोव्हेंबर २०२४ - महाविकास आघाडीचे अधिकृत विधानसभा उमेदवार श्री. दिपेश म्हात्रे यांनी आज डोंबिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांचा बहुप्रतिक्षित जाहीरनामा सादर केला. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. 'दिपेश म्हात्रे घेऊन आला ठाकरेंची सेना' या जोशपूर्ण गाण्याचे अनावरण देखील या कार्यक्रमात करण्यात आले. डोंबिवलीतील विकासाच्या प्रत्येक पैलूसाठी तयार करण्यात आलेल्या या जाहीरनाम्याने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले आहे. जाहीरनाम्यातील महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत:

**स्व. रामभाऊ कापसे प्रशासकीय भवन** - डोंबिवली पूर्वेतील धोकादायक स्थितीत असलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या इमारतीच्या पुनर्विकासाद्वारे, सर्व प्रशासकीय सेवा एकाच छताखाली आणण्यासाठी हे एकात्मिक प्रशासकीय भवन उभारण्याचा संकल्प आहे. हा प्रकल्प स्व. रामभाऊ कापसे यांच्या नावाने ओळखला जाईल आणि राज्यातील एक आदर्श प्रकल्प ठरेल.

**१ लाख नव्या रोजगार संधी** - वंदनीय बाळासाहेब ठाकरे बिझनेस सेंटर - डोंबिवलीतील स्थानिक रोजगाराच्या वाढत्या गरजेचा विचार करुन, बिझनेस सेंटरद्वारे एक लाख नव्या नोकऱ्यांची निर्मिती करण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या केंद्रामध्ये आयटी आणि विविध उद्योगांना संधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**डोंबिवली पश्चिमेतील रेल्वे जागेचा पुनर्विकास** - पावर हाऊस परिसरातील ३५० एकर रेल्वे जागेचा व्यावसायिक विकास करुन आयटी हब, बँकिंग क्षेत्र, आणि मोठ्या व्यवसाय उद्योगांना येथे आणण्याचा संकल्प आहे. यामुळे डोंबिवलीत आर्थिक विकासाच्या नव्या संधी निर्माण होतील.

**डोंबिवलीची ठणठणीत आरोग्य व्यवस्था** - डोंबिवलीत उत्तम दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध होण्यासाठी एक सुसज्ज सरकारी रुग्णालय उभारले जाईल. येथे अतिदक्षता विभाग, विविध प्रकारच्या शस्त्रक्रिया, डायलिसिस सेंटर, रक्तपेढी, कर्करोग उपचार केंद्र तसेच आपत्कालीन कार्डियक ॲम्बुलन्स सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे.

**वाहतूक, रस्ते आणि पार्किंग समस्या** - डोंबिवलीत रस्त्यांवरील खड्डे आणि अरुंद रस्त्यांमुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागतो. हे सर्व रस्ते खड्डेमुक्त करून शास्त्रशुद्ध पद्धतीने रुंद करण्यात येणार आहेत, तसेच पार्किंगच्या समस्येवर विशेष वाहनतळ (पार्किंग प्लाझा) उभारण्यात येतील.

**पाणीटंचाई दूर करण्यासाठी योजना** - रिंग रूट ते दुर्गेवाडी आणि मोठगाव मार्गावर जल शुद्धीकरण केंद्र आणि ८०० मिमी मापाच्या जलवाहिनीद्वारे डोंबिवली पूर्वेतील पाणीटंचाई लवकरात लवकर दूर करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

**वेद पाठशाळा, वयोवृद्ध देखभाल केंद्र आणि २४७ मदतवाहिनी** - हिंदू संस्कृतीतील वेदांच्या महत्त्वामुळे डोंबिवलीत वेद शाळा सुरु करण्याची योजना आहे. तसेच, वयोवृद्ध नागरिकांसाठी विशेष देखभाल केंद्र आणि २४७ मदतवाहिनी सुरू केली जाईल.

**रेल्वे व्यवस्थापन सुधारणा** - डोंबिवली रेल्वे स्थानकाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यात येईल. ५ नंबर प्लॅटफॉर्मवर शेड, महिलांसाठी शौचालये, विशेष महिला गाड्या, आणि अधिक गाड्या चाल वण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

**कल्याण जिल्हा, डोंबिवली तालुका** - ठाणे जिल्ह्याचे विभाजन करुन कल्याण हा स्वतंत्र जिल्हा करुन त्यात डोंबिवली तालुक्याचा समावेश करणे हा महत्त्वाचा उद्देश आहे. यामुळे प्रशासनाला नागरिकांना वेळेत सेवा देणे सुलभ होईल.या जाहीरनाम्यातील सर्व मुद्द्यांद्वारे, डोंबिवलीच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस योजना तयार केल्याची ग्वाही दिपेश म्हात्रे यांनी दिली. या कार्यक्रमास महाविकास आघाडीचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते, ज्यांनी या विचारांना जोरदार प्रतिसाद दिला.

# कल्याणमध्ये फुल मॅरेथॉनचे आयोजन


**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी) दि.१४ :** दरवर्षी, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण सर्व वयोगटातील लोकांमध्ये तंदुरुस्तीचा पुरस्कार करण्यासाठी तसेच रोटरी दिव्यांग सेंटर, कल्याण (प) आणि क्लबद्वारे चालवल्या जाणाऱ्या इतर समाजाभिमुख सेवा प्रकल्पांसाठी निधी उभारण्यासाठी कल्याणमध्ये मॅरेथॉनचे आयोजन करते. या मॅरेथॉनमध्ये दरवर्षी सरासरी दोन हजार हुन अधिक धावपटू सहभागी होतात.

'यंदाचे हे पाचवे वर्ष असून, या वर्षी, रविवार, २४ नोव्हेंबर रोजी पूर्ण मॅरेथॉन आयोजित करण्यात येत आहे. ही मॅरेथॉन TDAA (Thane District Athlete Association) आणि AIMS (Association of International Marathon and Distance Races) प्रमाणित आहे. रोटरी स्पोर्टस सर्कल गांधारी ब्रीज जवळ, नवीन रिंग रोड, कल्याण पश्चिम येथून या मॅरेथॉनचा प्रारंभ होईल. धावायच्या मार्गावर जागोजागी पिण्याचे पाणी, एनर्जी बुस्टर्स यांची सोय करण्यात येते. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला बिब, टीशर्ट, मेडल, नाष्टा, कुपन्स देण्यात येतील. विजेत्यांना पारितषिके दिली जातील.

एकंदरीत फार उत्साहवर्धक वातावरणात ही मॅरेथॉन होत असते. रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण टीम कल्याण-डोंबिवलीतील नागरिकांना मॅरेथॉनचा उत्तम अनुभव देण्यासाठी अहोरात्र झटत आहे. ङनागरिकांना आवाहन आहे की त्यांनी लवकरात लवकर मॅरेथॉनसाठी नावनोंदणी करण्याचो आवाहन करण्यात आले आहे.

संपर्कः ८३६९९५३६१६

# ग्रामीण रुग्णालय मुरबाड येथे सुरु होत आहे डायलिसीस सेंटर




**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता मुरबाड(प्रतिनिधी) दि.१४ :** ग्रामीण रुग्णालय मुरबाड (ट्रॉमा केअर सेंटर) येथे मुरबाड शहर व तालुक्यातील रुग्णांकरिता अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असे ५ बेडचे डायलिसिस सेंटर मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होत आहे. हे डायलिसिस सेंटर ग्रामीण रूग्णालयात सुरू करण्यात आलेले असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाने युक्त असे आहे. या ठिकाणी एकावेळी ५ रुग्णांवर उपचार घेणे सहज शक्य होणार आहे. डायलिसिस सेंटर मुळे मुरबाड व तालुक्यातील रुग्णांना खूप मोठा दिलासा मिळाला आहे. मुरबाड तालुका हा अतिशय दुर्गम आणी आदिवासी भागात येणारे ठिकाण असल्याने या ठिकाणांहून रुग्णांनाडायलिसिस साठी मुंबई, ठाण्या सारख्या शहरात जाऊन उपचार घ्यावे लागत असत, मात्र आता मुरबाड मधेच हे अत्याधुनिक डायलिसिस सेंटर सुरू झाल्यामुळे रुग्णांची होणारी हेळसांड व खर्च आता पूर्णपणे थांबणार आहे. रुग्णालयातील डायलिसिस सेंटर मध्ये मोफत डायलिसिस होणार असून या विनामूल्य डायलि सिस सेवेचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संग्राम डांगे यांनी केले आहे.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
कौशल्य विकास केंद्र, गोवेली, म्हसा व खर्डी
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु ! प्रवेश सुरु !

| | | |
|---|---|---|
| १) | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं. ३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २) | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं. २०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३) | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट(GNMA) (कोड नं. २०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४) | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५) | सिक्युरिटी अँण्ड फायर प्रिव्हिंजन प्रशिक्षण (कोड नं. ४११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
CALL: 8108559566 / 9158518832 / 9619188558
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मध्ये कंपनी, मिळकत, जमीन- जुमला, सहकारी संस्थांच्या नोटीस तसेच बक्षीसपत्र, घटस्फोट, पोटगी, नावात बदल आदी कायदेविषयक छोट्या जाहिरातीना केवळ ५००/- रुपयांत प्रसिद्धी दिली जाईल; कोणत्याही शासकीय नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क साधा.
:: कार्यालय ::
९६१९१८८५५८ / ९१५८०७८६०१
- E Mail -
jeevandeepvartanews2020@gmail.com news.thanejeevandeep@gmail.com

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, ISO ९००१:२००५
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. / B.Sc. CHEMISTRY MATHS / B.A.F. / BAMMC / B.Com. / B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT / M.Sc. CHEMISTRY / M.Com. ADVANCED ACCOUNTANCY / M.A. MARATHI / M.A. ECONOMICS / M.A. SOCIOLOGY / M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. रविंद्र नारायण घोडविंदे तथा कार्यकारी संपादक विजय गोविंद यादव यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले. (या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९१५८०७८६०१ E Mail – jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी